# केसीई सोसायटीच्या मुलींच्या वस्तीगृहात मोफत डोळे तपासणी

केसीई सोसायटीच्या मुलींच्या वस्तीगृहातील विद्यार्थिनींसाठी दरवर्षाप्रमाणे दि.१८ फेब्रु ते ३ मार्च या कालावधीत या वर्षी सुध्दा मोफत डोळे तपासणी कॅम्प आयोजीत करण्यात आला होता.जळगाव येथील नामांकित आय क्यू हॉस्पिटल येथे मोफत डोळे तपासणी करण्यात आली यात १५० विद्यार्थिनीनी मोफत डोळे तपासणीचा लाभ घेतला. यावेळी रेक्टर संजीव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यक्षा अंकिता वराडे ,उपाध्यक्षा कीर्ती अहिरराव,कावेरी महाजन ,नम्रता जैन,योगेश्वरी यावलकर ,वसुधा झोपे,दिपाली बाभुळकर,आरती मराठे,यांच्यासह सर्व कमिटी अध्यक्ष ,सदस्य व वसतीगृहातील विद्यार्थिनीनी सहकार्य केले .